जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
निवीदा सुचना दि. १२/०९/२०२५

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या आस्थापनेवरील जनित्रसंच (जनरेटर) नादुरूस्त झालेले असल्यामुळे सदर जनित्रसंच स्थानिक/बाहेरील कारागिरांकडून/तंत्रज्ञांकडून दुरूस्त करावयाचे आहे. करीता स्थानिक/बाहेरील बाजारातील दुकानदारांना/कारागीनांना/तंत्रज्ञांना सुचित करण्यात येत आहे की, ज्यांना जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे आस्थापनेवरील जनरेटर दुरूस्ती करीता दरपत्रक/निवीदा दाखल करावयाच्या आहेत, त्यांनी स्वत: किंवा आपल्याकडील तंत्रज्ञांकडून **सदर जनित्रसंचाची (जनरेटरची) तातडीने पाहणी करून आपले दरपत्रक/निवीदा सिलबंद लिफाफ्यामध्ये जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील कार्यालयात दिनांक २२/०९/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. तसेच निविदेच्या लिफाप्यावर जनरेटर दुरूस्तीबाबत दरपत्रक/निविदा असे ठळक अक्षरात लिहावे.**

जनित्रसंचाचे विवरण

POWERICA (SILENT DG SET)
RATING - 50/62.5
MODEL FAMILY NO. - PTS/SF5-01

स्वा/-
(हेमंत भ. गायकवाड)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा

वर्धा
दिनांक : १२/०९/२०२५

दरपत्रकाच्या/निवीदेच्या अटी व शर्ती :-

१. वेळेनंतर प्राप्त झालेल्या निवीदेचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
२. निवीदेच्या लिफाफ्यावर **जनरेटर दुरूस्तीबाबत निविदा** असे ठळक अक्षरात लिहावे.
३. निवीदा मंजुर किंवा नामंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार **मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा** यांना राहील.
४. दिनांक २२/०९/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्याअगोदरसिलबंद दरपत्रक/ निविदा या कार्यालयाला पोहचणे आवश्यक आहे.

पृष्ठांकण क्र. ४६०५/रो.व.वि.वि./२०२५
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक : १२/०९/२०२५.

प्रतीलीपी: माहीती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित

१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) नगर परीषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) संगणक प्रणाली संचालक, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

12/09/2025
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा

वर्धा
दिनांक : १२/०९/२०२५